उद्गार कविता न्यासपीठ

म. ग्रं. सं. ठाणें
विषय वगव्य
सं. क्र. 2493

# उद्गार

संपादक
डॉ. वि. म. कुलकर्णी
श्री. दत्ता. जी. कुलकर्णी

REFBK-0024358
REFBK-0024358

संदर्भ काव्य
२५९३
२८३५८
१५।१०।८

उद्‌गार कविता व्यासपीठ

# उद्‌गार

संपादन :

डॉ. वि. म. कुलकर्णी

दत्ता. जी. कुलकर्णी

REFBK-0024358
REFBK-0024358

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५९३
दा. क्र. २८३५८
काव्य १५।१०।८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

सुरेश एजन्सी

किमत पंधरा रुपये

प्रकाशक :
गुलाबराव मारुतीराव कारले
सुरेश एजन्सी
२०५ शुक्रवार
पुणे ४११००२

★

प्रथमावृत्ती
मे ८४

★

मुद्रक :
म. शं. परभाणे
सुभाष प्रिंटींग प्रेस
३९० शनवार पेठ, पुणे ३०.

# उदगार-कविता व्यासपीठ

- मोहफूल
- सहकार गाथा
- ओढ
- चिमण्या उडून गेल्या
- आंधळे
- मूर्ति
- सारेच सोसताना
- तहनामा
- काफिला
- पाणी
- तूं कां असा
- माय
- जरा जपून
- स्वप्नाचं कोंदण
- कांबळ
- या मायभूमीसाठी वाहिन माझा प्राण
- चिमण्या पसार झाल्या
- मेथीचं लगीन
- एक सांगणे
- पावसाळ्यातील भिजणे
- वाटतंय
- भुपूत्राचं जीवन
- भेट झाली ती कशाला
- शब्द उमलू लागले
- बोलल्यावाचून सारे
- साहित्यिक
- मीही एक माणूस
- आरती
- या तनूला
- गीता म्हणजे

आणि

- असे चालले दिवस
- गूढ उकलले
- सांज वात लावायची

# उद्गार – कवि

| | | |
|---|---|---|
| श्री. यशवंत बर्वे | श्री. एम्. के. कुलकर्णी | श्री. ह. म. पागडे |
| श्री. रामकृष्ण चौधरी | श्री. विलास वि. फडके | श्री. प्र. अ. पुराणिक |
| श्री. नन्दकिशोर शुक्ल | कु. सुनंदा कुंभकर्ण | श्री. अशोककुमार त्रिभुवन |
| श्री. डी. एस. पाटील | रामानद | श्री. ज्ञा. वि. वाघमारे |
| श्री. विनायक त्रिपत्तिनार | श्री. म. ग. पाठक | श्री. के. एम्. साळुंके |
| श्री. प्रकाश न. बावीस्कर | श्री. अशोक काळे | श्री. सावित्रीकुमार शिंगटे |
| श्री. मधुकर ए. निलेगावकर | सौ. वैशाली देशमुख | श्री. अवधूत म्हमाणे |
| श्रीः सुनील सावंत | श्री. रामकुमार पंडित | भाग्यतारा |
| श्री. ना. द. उंबरकर | डॉ. शंतनू चिंधडे | श्री. द. ज. जोशी |
| श्री. मा. मु. कराड | श्री. राम बेटावदकर | श्री. ज. कृ. देवधर |

आणि

डॉ. वि. म. कुलकर्णी, सौ. संजीवनी मराठे, श्री. दत्ता. जी. कुलकर्णी



थोर समाजसेवक व शिक्षण तपस्वी

# स्व. श्री. तात्यासाहेब कारले गुरुजी

( माजी महापौर, पुणे महानगरपालिका. )

## कै. कारले गुरुजीस....

चंदनाचे वृक्षा सर्वांगी सुगंध
प्रेमाचा आनंद अंतरंगी...
सर्व जन सुखी राहोत सभोती
म्हणोनि साउली धरियेली...
ऐसा संतजना करिता वंदन
होतसे पावन देह–मन... !

– वि. म. कुलकर्णी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2493
दा. क्र.
मुंबई शाखा (स्थळ प्रत)



स्व. श्री. तात्यासाहेब कारले गुरुजी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५९२३
दा. क्र. २२३५८
काव्य १५१९०
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# तात्यासाहेब कारले गुरुजी

माणूस खेड्यात जन्मला, की तो मागे राहतो, त्याची प्रगती होत नाही – ही गोष्ट खरी नाही. शहरात जन्मलेला माणूस सुद्धा जन्मभर शहरात राहूनही तो व्यर्थच जीवन जगून गेलेला मानव ठरू शकतो. याचा अर्थ शहर आणि खेडे हे तुमच्या प्रगतीच्या आड न येणारे घटक होऊ शकतात. त्यासाठी प्रयत्नवादाची कास धरणे आवश्यक असते. चिकाटी, दैव आणि प्रयत्न यांच्या जोरावर मनुष्य आपली प्रगतीची पावले योग्य दिशेने आयुष्यात उचलू शकतो. याचे गेल्या पिढीतील प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे पुण्याचे तात्यासाहेब कारले गुरुजी होत.

तात्यांचं गाव अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील खडांबे हे होय. ह्या लहानशा गावी शेतकरी कुटुंबात १८९८ साली त्यांचा जन्म झाला. त्यांचं नाव मारुती. त्यांच्या पिताजींचं नाव रखमाजी. रखमाजी शेती करीत. नगर जिल्हयातील ती शेती, कुटुंबाच्या पोषणाला पुरेशी होत नसे. तरी पण अन्य साधन नसल्याने गावातील इतरांच्या प्रमाणे कारले कुटुंब गरीबीला तोंड देत जगत होतं.

रखमाजीला वाटे मुलानं शिकावं. गावात मराठी ३ ऱ्या इयत्ते-पर्यंतच शाळा होती. मारुतीनं त्या पूर्ण केल्या. तेथून ३ मैलांवर वांबोरी नावाचं गाव आहे. तेथे तो मराठी ४ थी इयत्तेच्या शिक्षणासाठी रोज चालत जाई. वांबोरीच्या शाळेतून चांगल्या मार्कांनी व्ह. फा. परीक्षा मारुतीने पास केली. मारुतीला घरातील लोक तात्या म्हणत याच नावाने ते पुढे आयुष्यभर ओळखले जात होते. त्यांचे पिताजी रखमाजी आणि बंधू यशवंतराव शेतीकडे लक्ष देत, त्यामुळे फायनल झालेल्या तात्याने पुढील शिक्षणासाठी पुण्याला जावे, असे ठरले. फायनल नंतर ताबडतोब नोकरी मिळ-ण्याचे ते दिवस असूनही त्यांनी पुण्याच्या 'ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन' येथून तीन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केला, आणि ते 'थर्ड इअर ट्रेंड'- झाले.

गणित आणि मराठी हे तात्यांचे आवडते विषय. व्याकरण सोप्या प्रकाराने शिकवावे ते तात्यांनीच. तात्यांच्या ह्या शिक्षकी जीवनाचा उपयोग पुण्याच्या शिवाजी मराठा हायस्कूलला झाला. कारण ही शाळा नुकतीच कै. बाबूराव जगताप यांनी त्या काळी स्थापन केली होती. ते स्वतः शिक्षणतज्ज्ञ असल्याने त्याचा उपयोग तात्यांनाही खूप झाला. तात्या कडक शिस्तीचे, पण विद्यार्थ्यांवर प्रेम करणारे शिक्षक म्हणून ओळखले जाऊ लागले.

याच काळात सर्जेराव ऊर्फ भाऊसाहेब जगताप यांची ओळख तात्यांशी झाली. तात्यांचे गणितातले ज्ञान पाहून त्यावर आपण पुस्तक काढावे असा विचार भाऊसाहेब जगताप यांनी कारले गुरुजीं-जवळ बोलून दाखविला. झाले 'बालबोध गणित' हे पहिले पाठ्य-पुस्तक तात्यांनी आणि भाऊंनी तयार केले आणि छापलेसुद्धा. अशा प्रकारे 'जगताप कारले प्रकाशन' संस्थेची या पुस्तकाने बत्तीससाली मुहुर्तमेढ रोवली गेली. अठ्ठावीस वर्षे कारले गुरुजी शिवाजी मराठात शिक्षक म्हणून कार्य करीत होते. नंतर ते निवृत्त झाल्यावर

पूर्ण वेळ प्रकाशनाकडे लक्ष घालू लागले. या प्रकाशनाच्या विक्रीसाठी सुरेश एजन्सी निर्माण झाली आणि या प्रकाशनाच्या पुस्तकांच्या मुद्रणासाठी जनसेवा मुद्रणालय स्थापन झाले. पुढे नवमहाराष्ट्र प्रकाशन एकोणीसशे बासष्ट सालो काढण्यात आले.

भाऊ आणि तात्या यांच्या मार्गदर्शनाखाली या संस्था आपापल्या क्षेत्रात नावलौकिकास चढल्या. कारले गुरुजींनी केवळ उत्तम शिक्षक म्हणून लौकिक मिळविला नाही तर ते एक उत्तम प्रकाशक म्हणूनही मराठी भाषेत ओळखले जाऊ लागले. समाजसेवेचे धडे केवळ त्यांनी मुलांना शाळेत दिले नाहीत तर ते स्वत: समाजसेवक म्हणून अबोलपणे विविध प्रकारे कार्य करीत राहिले. शिवाजी मराठा सोसायटी, (उपाध्यक्ष आणि का. म. चे अध्यक्ष) मराठा, बोर्डिंग, डेक्कन मराठा असोसिएशन, अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद (उपाध्यक्ष), शाहू महाविद्यालय, शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल अशा विविध संस्थांतून ते विविध पदांवर अनेक वर्षे कार्य करीत होते पुणे मुद्रक संघाचेही ते उपाध्यक्ष होते.

या संस्थांतून समाजसेवा करीत असता, त्यांनी अनेक गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत केली आहे. राजकारणी नसूनसुद्धा ते काँग्रेस पक्षाचे अनेक वर्षे क्रियाशील सभासद होते. पक्षाच्या अनेक विधानसभा, लोकसभा निवडणुकीत त्यांनी पक्षाच्या उमेदवारासाठी परिश्रम घेतले. अखेरीस बासष्ट साली पक्षाने त्यांना पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीला उभे केले. ते निवडूनही आले. पासष्ट साली ते पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाचे अध्यक्ष झाले आणि सदुसष्ट साली पुण्याचे महापौर म्हणून निवडून आले. तात्यासाहेब कारले गुरुजा पुण्याचे महापौर झाले. एक प्राथमिक शिक्षक पुण्याचा पहिला नागरिक झाला. ते महापौर असतानाच नेहरू स्टेडियम, महात्माफुले मंडई, आणि बालगंधर्व रंगमंदिर यांची बांधकामे चालू होती. त्यांनी या सर्व बांधकामांकडे

लक्ष दिले, काळजी घेतली, पु. ल. देशपांडे यांच्या हस्ते जेव्हा बालगंधर्व रंगमंदिराचे उद्‌घाटन झाले, त्यावेळी ते म्हणाले, 'या बालगंधर्व रंगमंदिराच्या बांधकामाच्या वेळी कारले गुरुजींची फार मदत झाली. अत्यंत आस्थेवाईकपणे ते बांधकामाची चौकशी करीत असत. कारलेगुरुजींसारखे शिक्षक मला मिळायला हवे होते.'

आपल्या छोटयाशा गावाला ते पुण्यासारख्या अफाट नगरीत येऊनही विसरले नाहीत. आपली शिक्षणाची झालेली आबाळ आता गावातल्या मुलांची होऊ नये म्हणून त्यांनी खडांबे या गावी हाय-स्कूल सुरू केले. त्या शाळेला सर्व प्रथम त्यानी बारा हजार पाचशे रुपये अशी भरघोस देणगी त्या काळी सर्वप्रथम दिली.

तात्यांनी शिकविलेली अनेक मुले पुढे नावलौकिकास चढली आहेत. त्यापैकी कै. राजारामबापू पाटील, श्री. भाई वैद्य, श्री. शिवाजीराव ढेरे, श्री. रामभाऊ तेलंग ही काही त्यांच्या विद्यार्थ्यांची बोलकी नावे होत.

तात्यासाहेब कारले गुरुजींना परमेश्वराने दीर्घ आयुष्य दिले, त्याचा उपयोग त्यांनी बहुजन हिताय, बहुजन सुखाय यासाठी आपल्यापरीने केला. एक्याऐंशी साली २६ जानेवारीस ते चिरनिद्रिस्त झाले. त्यांचे कर्तबगार चिरंजीव श्री. बाळासाहेब हे त्यांचे व्रत आपल्यापरीने पुढे चालवीत आहेत.

# सांजवात लावायची....?

पहाटेचा वारा कसा व्हातो शीतल
घरट्यात पाखरांची चाले किलबील

अंधाराच्या पालखीत गेली निशा दूर
उषा आली उधळीत सोनियाचा धूर

नीज माझ्या डोळ्यावर अजून रेंगाळे
आळसाला पुन्हा माझ्या झोपेत फावले

जीविताची सकाळ ही जाईल निघून
आता डोईवर माझ्या तळपेल ऊन्ह !

मिळेल का जागा मला कुठे विसाव्यास
सांजवात लावायची पुरेल का हौस ?

**दत्ता जी. कुलकर्णी**

सत्यकथा : ४६



# गूढ उकलले

एकपणामधि द्वैत वितळले
प्रीतीचे मज गूढ उकलले
प्रीती जडता घडली दुनिया
विरघळली अशुभांची छाया
अनन्य काही उरी उजळले !
नुरली भाळी चिंतारेषा
नुरला ओठी भाव बोलका
मौन जणू देहीं परिमळले !
संवेदन ते. तशी प्रतीती
रूपांतरिता अभिनव गीती
नादवीत स्वर नवे उमटले !
कोण कुणाची करित आरती
कोण भक्त अन् कुठली मूर्ती
उपचाराविण पूजन घडले !
एकपणामधि द्वैत वितळले
प्रीतीचे मज गूढ उकलले !

— संजीवनी.



# असे चालले दिवस ... !

उगवत्या–मावळत्या । साक्षी सूर्याला ठेवून
रोज करीत नवस । असे चालले दिवस ...
सुख दुःखाचे चंचल । धागे राहिलो गुंफीत
कधी गालावरी अश्रू । कधी ओठावरी गीत !
कधी भेटले दिंडीत । जिवाभावाचे वैष्णव
अभंगाच्या रंगासंगे । धुंद धुंद झाले विश्व
अंधारातून केधवा । आले पाठीवरी तीर
तरी आतल्या ज्योतीने । नाही सोडलाच धीर !
अंगणात सांभाळिली । गृहलक्ष्मी सदाफुली
चार फुलांच्या डौलात । दुनियाच सावरली
माळावरून फिरलो । बांधावरी वावरलो
कधी फुलाच्या नादाने । काटया कुटयात शिरलो
कधी जागत राहिलो ... । 'आता उजाडेल कसे ?'
पाठी बांधल्या भाराने । मन झाले वेडेपिसे
'देव' पूर्वेच्या दाराशी । आला घेऊन कलश
सारी मावळली भ्रांती । असे चालले दिवस ?
उगवत्या–मावळत्या । देवा ! तुला दंडवत
आता चालवी चालवी । माझा धरूनिया हात !

**वि. म. कुलकर्णी,**



# मोहफूल

मोहफूल ते हुंगता पाऊल पडते वाकडे ।
मोहवेड्या या मनाला मोह क्षितिजाचा पडे ।।
क्षितिज वाटे टेकलेले, टेके उरीं क्षितिजांध तो ।
सागराचे बांध तुटले, अडवीत रेशीम–बंध तो ।।

हा बंध उरतो व्यापुनी, आयुष्य सारे कोरूनी ।
चतकोर हर्षाचा मिळावा, घास ऊर्मी मारूनी ।।
मारूनी मन मानवा रस्ता सुखाचा सापडे ? ।
धन–कीर्ति–डंका वाजता क्षितिज भासे तोकडे ? ।।

तोकडे कर्तृत्व त्याचे मद–मोही मतिभ्रम दंग तो ।
मत्कूण तो चिरडून टाका, संकेत-हीरक भंग तो ।।
भंगतो कुणी ध्यास–वेडा ध्येयमार्गी चालता ।
रंगते कधी रासक्रीडा राधा युगींची डोलता ।।

डोलता मुरलीत हरिच्या सर्व अचर–चरांगण ।
हरि–मीलना उद्युक्त राधा बांधूनी अग्नीकंकण ।।
कंकणा पिचवूनि निघती वीर युद्धाला पुढे ।
त्यागितो गांडीव कोणी ‘ गीता ’ कुणाला आवडे ।।

आवडे चित्सत्य कोणा सर्व घटनांमागले ।
वेडेच पण ते श्रेष्ठ ठरतीं जेथ श्रेष्ठी भागले ।।
भागले मयकार सारे, सरडेच ते क्षितिजापुढे ।
मोहवेड्या या मनाला मोह क्षितिजाचा पडे ।।

–यशवंत बर्वे,



# सहकार गाथा

सहकाराने उद्धारा जग आज्ञा देवाची
जन हो ऐका रसाळगाथा ही सहकाराची ।। धृ ।।
पंढरपूरचा विठ्ठल ठेवी कमरेवर हाता
सहकारी जन मज आवडती तो सांगे जगता
कमरेवरती हात ठेवूनी होई आव्हाना
सहकाराने जग उद्धारून तारीन दलिताना ।। १ ।।
मंगलमूर्ती गणेशमूर्ती संकट नेवारी
दर्शनमात्रे मंगल जीवन दावी सहकारी
चिमूट दाखवून हात पसरीला मागे सहकारी
भ्रष्टाचारा निपटून काढीन तो सांगे शहरी ।। २ ।।
पाषाणांची व्यंकटमूर्ती देव चक्रपाणी
महती सांगे सहकाराची ओमकारवाणी
चंद्रनभीचा पूर्ण पोर्णिमा सुखवी जगताला
सहकाराने फुलवी जीवन सांगे धरतीला ।। ३ ।।
नीलकंठ तो शंकर शोभे कैलासावरती
वीष पचवुनी उभा ठाकीला रुद्राचल जगती
स्वार्थाने जर मदांध होशील तोडीन भवपाठी
त्रिनेत्र उघडून जाळून टाकील सकाळच्यासाठी ।।४।।
हनुमंताची नीती केवढी राम-मणी पाही
सहकारावीण कशी कुणाला सद्गती ती नाही
वज्रघाते तोडून टाकोन वीण शृंखलेची
दास्य मुक्तता होईल जगती सेवाभावाची ।। ५ ।।
दुर्गामाता सिंहासनी तो सिद्ध शस्त्रधारी
चार भुजांची माता समता शिकवी संसारी
देवराज्य हे लोकशाहीचे भूवरी व्हावे
अवघे जीवन मंगलदायी सहकारी व्हावे ।। ६ ।।

**—एम. के. कुलकर्णी,**

# ओढ

तिला ओढ लागलीय
त्याच्या येण्याची
त्याचं स्वागत करण्याची
त्याच्या सर्व तयारीची

खरंच तिला ओढ लागलीय
त्याच्याशी मुक्त कंठाने बोलण्याची
त्याच्या विळख्यात सामावण्याची
त्याच्याशी बोलण्याची, उठण्याची
त्याला सर्वस्व बहाल करण्याची

पण तो कधी येणारच नाही
यायला निघालाय पण मध्ये संपलाय
आता अंत्ययात्रेची तयारी चाललीय
आता फक्त तिला ओढ लागलीय

त्याचे अखेरचे मुखावलोकन करण्याची

–ह. ग. पागडे



# चिमण्या उडून गेल्या....

डोळ्यांत पाहताना नजरा चुकार झाल्या ।
रस्त्यावरून माझ्या चिमण्या उडून गेल्या ।।
दाऊन शेत त्यांना जामीन राहिलो मी ।
अन्नान्न मी उपाशी फिरवून पाठ गेल्या ।।
डोळ्यांत पाहताना ...

स्वप्नात बांधलेले घरटे उजाड झाले ।
कंठात हुंदक्यांच्या इच्छा मरून गेल्या ।।
डोळ्यांत पाहताना ...

चोचीत वेचलेली ती गोड सर्व गाणी ।
मारून डंख दिवसा जखमा करून गेल्या ।।
डोळ्यांत पाहताना ...

–रामकृष्ण चौधरी



# आंधळे

कशास पहावे पाशवी सोहळे
त्याहुनी आंधळे बरे आम्ही ॥
अत्याचार येथे होती जागोजाग
तरी नाही जाग कुणालाही ॥

सभोवती माजे मोठा भ्रष्टाचार
जणू सदाचार आजचा तो ॥
नीती आणि न्याय जाहले पुराणे
गाणे डिस्को गाणे अनीतीचे ॥

गुंडाना माजोरी ओशाळे पुढारी
सज्जना लाचारी आज येथे ॥
माजती दुर्जन भेकड सज्जन
होई दाणादाण दुर्बलांची ॥

तुका म्हणे देवा हवे कशा डोळे
त्याहुनी आंधळे करी आम्हां ॥

—विलास वि. फडके

# मूर्ती

प्रभूच्या यातना प्रभूलाची ठावे
काय म्या वर्णावे
हाल त्याचे ॥१॥

जगाचा प्रपंच त्यानेचि निर्मिला
मनु हा जाहला
डोईजड ॥२॥

म्हणे देव कोठे आम्हासी दाखवा
का न उमजावा
खेळ सारा ॥३॥

त्याचीच लेकुरे त्यालाची हसती
सारी अज्ञानी ती
वाटे ऐसे ॥४॥

धर्म–मानवता लोपली ही जणू
भस्मासुरी अणू
जगी व्याप्त ॥५॥

प्रभु पुढे प्रश्न कैसा ये सुदिन
धरोनिया मौन
बैसलासे ॥६॥

–प्र. अ. पुराणिक

# सारेच सोसताना

सारेच सोसताना
रडता मला न आले
हे घाव या जगाचे
पुसता मला न आले

जो पाहतो–तो झेलतो,
थुंकी वरिष्ठांची
उन्मत्त पेंढाऱ्यांपुढे,
झुकता मला न आले

नाहीच शेवटी तो,
कधी लाभला निवारा
वस्तीत या ठगांच्या,
मज राहता न आले

जाऊन पंढरीला,
परतून मात्र आलो
गर्दीत दांभिकांच्या,
घुसता मला न आले

सगळीकडून होतो,
ज्वालांत वेढलेला
वणव्यात वास्तवाच्या
विझता मला न आले

–नंदकिशोर शुक्ल

# तहनामा

या शस्त्राचे चकचकीत पाते म्यान केले
तेव्हा माझा सूक्ष्मसा सुस्कारा
जाणवला नाही तुम्हाला ?

अशा अनेक शस्त्रास्त्रांचे वार
माझ्या ढालीमागे दडलेले दिसतील तुम्हाला!

तुम्ही पराक्रमाची शर्थ केलीत; तरी
कितीतरी "हळदी घाट" उतरावे लागले तुम्हाला !

शंभर मोत्ये गळाली, दोन हिरे भंगले
असले पेशवाई हिशेब तुम्हीच करू जाणे !

इतकेच सांगायचे तहनाम्याच्या शेवटी,
तुम्ही कितीही कुठूनही
आणा– शस्त्रे आणि हत्यार !

तुमचा सत्वाला विरोध हीच
माझी झालीय धार;
होऊन हातातील तलवार;
अन् डोळे खरिदांगार !

–छंदसी ऊर्फ सुनंदा कुंभकर्ण



# काफिला

आयुष्य आजला हे माझे मलाच ओझे
तो दूर काफिला अन् वाळूत पाय माझे
माझ्याच प्राक्तनाचे तुडवित रान येथे
गेल्या किती वराती तो नाद आज वाजे
आकाश बांधिले मी माझ्याच या हातांनी
सांडून तारका त्या आकाश रिक्त माझे
स्वप्नात सांजवेळी स्वप्नील तो किनारा
फेसाळल्या क्षणांचे लाटात गीत वाजे
सारेच साज आता गातात सूर विरही
डोळ्यांत दाटलेले नभ आज वेदनांचे

—अशोककुमार त्रिभुवन



# पाणी

पाणीच जगी अमृत ...
धरती, जन सुखावितं

सजीव भूमी,
सजीव जन
दिसती पाण्याने
सुशोभून !

रान दिसे निळे हिरवेगार,
ते पाण्याने डुलते फार !

नीर आहे म्हणूनतर
सजीव करीती थरथर !

धरती, प्राणी खग तरू
होतात सलील पिऊनी तृप्त !

म्हणूनी निर्मिले प्रभूने
पय सागरी अमृत–अमृत !!

पाणीच जगी 'अमृत'
धरती जन सुखावीत !!

पाणी असावे अंगात
मग येईल रंगत !

–डी. एस. पाटील

# तू का असा

आहे संसृतिचा गृहीच तुजला व्याप्ती पसारा भला
ऐशा या भुवि सावधान अधुना होणे जमेना तुला
जाशी चित्रपटासि व्यर्थ घरचा पैसा तुवा खर्चिला
दुष्टा रे मज मूर्ख तूच गमसी तूझ्यापरी दुर्बला

सत्शीला तव रे जुगार बुडवी दारूमध्ये हे जिणे
नाही त्वन्मनसा गमे चुकुन ते संस्कार रे पाहणे
येई ना मनि एकदाहि दमडी देवापुढे ठेवणे
लाखो त्या व्यसना अधीन अससी मूर्खांसवे (राहणे)

तीर्था ना कधि तू मनात भजसी, जाणे जळो ते जिणे
एखादे शुभ कार्य होत असता भीती मनी पाहणे
ग्रंथा त्या नच वाचण्यास सजणे निर्बुद्ध तूझे जिणे
त्वाहस्ते तर भूक्षितास शमणे हे स्वप्न ना पाहणे

सत्याची तव नित्य कास धरिता तत्तेज येई बहू
सन्मार्गे जरी वागशील जगती तू धन्य होसी बहू

—रामानंद



# माय

हे माय, तुझी माया,
डोळ्यापुढे दिसते तुझी कृश काया.
माझ्या डोळ्यांच्या बाहुल्या,
तुला पहाण्यासाठी आसावल्या.

पडल्या चेहऱ्यावर तुझ्या सुरकुत्या,
झाला तुझ्या केसांचा बारीक अंबाडा,
परि तू हाकीसी आमुच्या जीवनाचा गाडा.

तुझ्याच कृपेच्या साउलीने,
राहतात सर्व आनंदाने.
झिजते तुझी अती काया,
सर्वांवरी करशी तू कृपेची छाया.

तुझ्याच आशिर्वादाने,
तुझ्याच इच्छेने,
सर्व माझे हे आनंदी जगणे.

चालतांना तोल जातो तुझा,
कापतो हात थरथरा तुझा,
तरी तो दुसऱ्यासाठी झिजतो,
अशी ही तुझी माया.
ओवाळून टाकली जरी माझी काया,
परी तुझा उपकार न फिटे मज जन्मी या.

– ज्ञा. वि. वाघमारे ऊर्फ सूर्यकांत

# जरा जपून

चार चौघांच्या चौकटीतलं
भाषण ठोकणाऱ्यांचे सत्कार होत आहेत,
फाटक्या लक्तराने अब्रू झाकणाऱ्या
आयाबहिणींवर दिवसा ढवळ्या बलात्कार होत आहेत.

बोलणाऱ्याने बोलावे खूप मोलाचे
ऐकणाऱ्यांचे नाममात्र 'हू' असे हुत्कार होत आहेत,
रिकाम्या टीचभर खळगीच्या आगीने
होरपळलेल्या चिल्यापिल्यांचे चीत्कार होत आहेत.

उसनी काळजी, खोटी सांत्वना अन्
पोकळ आश्वासनांचे रोज चमत्कार होत आहेत,
तरुणांनो ! जरा जपून अंधार तुडवा
काळनागांचे विषारी फुत्कार होत आहेत.

– **विनायक त्रिपत्तीवार**



# स्वप्नाचं कोंदण

माझ्या ग अंगणी स्वप्नाचं कोंदण
जाग आली बाई चंदेरीच रिंगण ॥धृ०॥

गर्द पोपटी पाने माझ्या ग स्वप्नांना
जोजविती कशी ग जीव पोळतांना
वाजविती टाळ्या, खेळविती चांदण ॥१॥

रंगे गुलाबी स्वप्न, पावलोपावली,
बागेतला केवडा, बिंब खुले गाली,
खद्कन लज्जेच ग हसे तोरण ॥२॥

मोगऱ्याचा वास माझ्या गडे स्वप्नांना,
निळ्या आभाळाशी त्या गुज बोलताना,
आंबेमोहोर ग दरवळे, अंगण ॥३॥

पाण्याच्या खळाळात मन विसावलं
पंचमीच्या ताली दिस सुगंधी न्हालं
मायेच्या ग पंखाखाली जीव पावन ॥४॥

—श्री. महादेव गणपत पाठक



# कांबळ

कुबेर पुत्रांच्या चढाओढीत
माझे फार हाल केलेस
फरफटले......ओरबाडले
रक्तबंबाळ होईपर्यंत !

पण तू फार दूर गेलास
क्षितिजाच्या एका टोकावर टाकून !
मनाच्या चिंध्या चिंध्या केल्यास
पोलादी टाचांचे पाय रोवून !

बेअब्रूचं आभाळ फाटून
तुझ्यावर गळती लागली
त्याची तुला पर्वा नाही
मी मात्र, त्या चिंध्या चिंध्या जपून

'कांबळ' शिवेन
आतड्यांचा दोरा लावून
समजा भविष्यात उघडा पडलास तर
निदान पांघरायला तरी
कामी येईल तुला !

— के. एन. साळुंके.

# या मायभूमीसाठी, वाहिन माझा प्राण

देता देता काय देऊ मी, मन पडले भ्रमात
या मायभूमीसाठी, वाहिन माझा प्राण ।।धृ.।।

या मातृभूमीचा हा प्रतीकण
शिल्लक जोवरी रक्ताचा अंश
रात्रंदिन या मायभूमीचे करील मी रक्षण ।।१।।

कोटी शस्त्रासह येऊदे शत्रूचे ते दळ ।
पाठविन यमसदनी तयांना करीन मी घायाळ
घोर संकटी या भूमीचे करीन मी रक्षण ।।२।।

रणांगणावर लढता लढता
जरी मजला मृत्यू आला
सांजसकाळी जन ऐकेल माझे शौर्य गान ।।३।।

— प्रकाश न. बाविस्कर.

# चिमण्या पसार झाल्या–

पृथ्वीचाही नकाशा माहीत नसणाऱ्यांनी
सात जन्म सात स्वर्गांच्या परिभाषा पढवलेल्या
कुंकवासारख्या लाल चोचीच्या काही चिमण्या
अचानक आज माझ्या अंगणात आल्या...
माणुसकी म्हणून दाणे टाकले तर गुपचूप खाऊन
उडून जावं तर नाही
नुस्ता चिवचिवाट
त्यांनीच शिकवलेल्या भुपाळी पासून भैरवीपर्यंतचा
नुस्ता चिवचिवाट
शेवटी कंटाळून मी विचारलं
तुम्हाला हेच अंगण दिसलं का ?
तर म्हणाल्या
तुम्ही लेखक वगैरे आहात म्हणून आलोत...
मी म्हटलं
मी लिहिण्यासाठी जगणारा नव्हे
जगून काही लिहिता येतं का बघतो
तर साऱ्या चिमण्या पसार
कोशबद्ध प्रेयसीसारख्या
साऱ्या चिमण्या पसार.

– अशोक काळे.

# मेथीचं लगीन

गहू हरबरा, जवार यांची सरत आली सुगी,
चाकवत मेथीचं लगीन लावाय कराड लागलय मार्गी ।
ओढयाच्या काठावर चाकवतासंगं लगीन लागतय मेथीचं,
मांडव सजलाय केळीचा अन् हृदय फुललय शेतीचं ।।
बाप झालाय जुनाट उंबर, चिंचेनं कसलीय आपली कंबर ।
गवार, भेंडी नवरीच्या करवल्या, काटेरी वांग्याच्या
मेहुण्या साऱ्या ।
लग्नाच्या दंग्यात सर्वीच मिरवली, वांग्यानं गवार भेंडीची
हौसच पुरवली !
नारळाला म्हणते हळूच खारकी, पोरगी अजून किती हो
बारकी ?
गुलाब झेंडू दावतोय तोरा, चाकवत झालाय गोरामोरा ।
कापसाच्या बोंडाला आलीय घात, वाकून बघतीया
कांद्याची पात ।
केळीचा पिकलाय आत्ताशी घड, पेरू पहातोय खाऊन पड ।
आंबा पपईनं अंतरपाट धरला, लग्नाचा सोहळा संपत आला ।
खारकी म्हणतेय नारळाला; आता तरी थोडसं वाका,
केळी सांगतेय आंब्याला मोहराच्या थोडया अक्षता टाका ।
मेथीचं लगीन केळीच्या मांडवात, फुलांची नक्षी पाण्यावर,
जांभळं रुसली अक्षता फेकली. अक्षता गल्या वाऱ्यावर ।।

—सावित्रीकुमार शिगटे,

# या तनुला

गौर अशा या तनुना
सुखवावे कोणी तरी
झुरणाऱ्या मनास या
रिझवावे कोणी तरी ।। ध्रु ।।

कोमल गुलाबी अधरांना
ओढ लागली सुखाची
क्षण एक एक आठविता
मी हरखुनि जाते मनी

सांगू कुणास मी तरी
व्यथा माझी कशी
सदैव समोर उभी
तूझीच मूर्ति रे अशी !

किती समजाविले मी मना
परी तोल जायचा राहीना
क्षणभरी चित्त स्थिर राहिना
कधिरे येशील तू सजणा

—मधुकर ए. निलेगावकर,



# राहती मागे खुणा

जोवरी जीव देही तोवरीच सर्व नाती
येणार ना कुणी गेलांस म्हणूनी संगती
कोण होता काय नाते त्यास ना ठावे
संपता खेळ इथला नकळत निघुनि जावे ॥१॥

मृत्यूचे गूढ कुणा कधी ना उकलले
अखेरच्या क्षणी तुजला मातीने कवटाळले
आज तो गेला जरी उद्या तुजला जायचे
मृत्यूचे पाश वेड्या कुणा कधी ना सुटायचे ॥२॥

मार्ग ना ठावे तयाचा दाटते भीती उरी
जग सारे नाचते मृत्यूच्या तालावरी
गरीब वा श्रीमंत मृत्यू ना चुकला कुणा
मरणारा जातो पुढे, राहती मागे खुणा ॥३॥

—सौ. वैशाली देशमुख



# एक सांगणे

एक सांगणे मना तुला ।। धृ. ।।
जगतामाजी दुःखसागरी
विकट रूप ते दिसे विकारी
करू नको तव वृत्ति बावरी
धैर्य सदा तू देइ जिवाला ।।१।।

ध्यासाने तुज इच्छित मिळते
अविचाराने सर्व नासते
सत्संगाने सर्वहि कळते
विवेक रे तू धरी चांगला ।।२।।

विश्वासी फल दायक
माया देवाचीच महा
भक्तीने तू चरणी रहा
तरुन जाण्या मार्ग एकला ।।३।।

होऊनि गेल्या थोर विभूती
केली त्यांनी लोक जागृती
निदान स्वतःला हो मुक्ती–
स्वार्थ एवढा साध भला ।।४।।

सुखदुःखाशी खेळ खेळुनी
पडू नको रे त्यात गुंतुनी
सतत हरीचा ध्यास धरूनी
तार तुझ्या या 'अवधूता'ला ।।५।।

–अवधूत म्हमाणे

# पावसाळ्यातील भिजणे

हल्ली मला पावसाळा जवळचा वाटतो
यथेच्छ एकटयाने भिजावे
थेंबाचं अस्तित्व न शोधता !

फुले–वेलीसारखी तनुवेलही बहरावी–पावसात !
पाटी पुसल्यानंतरची रात्र साकारावी
मनाच्या अथांग आभाळावर–शिशिरात !

मनाचे रंग पावसाळयातील आभाळासारखे–नेहमी
बदलणारे !
म्हणूनच स्वतःचे वाटणारे–ते काळपट करडे रंग !
आभाळ झाडे शोधत भटकते पावसाळयात–यथेच्छ
बरसण्यासाठी
पण झाडांऐवजी अमित गगनी इमारतीच भिजतात !

मग कुठल्यातरी झाडाचे मूळ अकस्मात भिजते
भिजते एकीकडे अन् झाडं बहरते दुसरीकडे
हे असेच घडणारे असते.

म्हणून चालताना पायाखालचे मूळ मी बघत नाही
समोर भिजणारे झाड पाहून–क्षणभर का होईना तिथे
थांबतो !

त्या झाडाशी बसतो–बस्स इतकंच !
त्या झाडाचं मूळ कळत नाही–मग पुन्हा तेच...
पावसाळचातील भिजणे...पावसाळा जवळचा वाटणे...!

–सुनील सावंत

# वाटतंय

वाटतंय,
गुलाब होऊन तुझ्या सोनेरी
भुरूळया-भुरूळया केसात तुझ्या
माळवून घ्यावं स्वतः
वाटतंय,

मंद झुळूक होऊन
त्या पदराला सळ-सळून
शहारावे तुझे तूझे सर्वांग.
वाटतंय,

तुझ्या पायातील नपुराच्या
संगीतात मूग्ध व्हावे अन्
स्वरांनी राग आळवावा.
वाटतंय,

तुझ्या टपोऱ्या डोळयांतील
मृगजळ व्हावे आणि
वेडेवाकडे गाला-ओठावरून
ओरंगळत-ओरंगळत
धडधडत्या श्वासावर टपकावे
संथपणे... वाटतंय...

– रामकुमार पंडित रायवाडीकर.

# भूपुत्राचं जीवन

भलतच भरात आलेलं पीक,
त्यात वाऱ्याचा धुडगुस अवखळ
भुकेच्या पेटत्या क्षणी नेमकी
कानात कारभारणीची गुंतली चाहूल

मोट वडणाऱ्या जीवांना न्याहरीचा
मिळणारा हक्काचा विसावा
बोरीच्या काटेरी जाळी आड
मादीसंगं घुमणारा लाव्हा

धावंवरल्या रशिल्या पानापानातून
उठणारी तीक्ष्ण तितकीच मधूर शीळ
कणखर देहाभोवती वर्णलतेनं
नाजूक बाहुंचा भरलेला पीळ

हिरव्या पिवळ्या पानांआड पंखापिसात
चोची फिरविणाऱ्या पक्षांचं कूजन
या निसर्ग चक्रात लयबद्ध झालेला
माझ्यासारख्या भूपुत्राचं मुग्ध जीवन

– भाग्यवंत लक्ष्मणराव नायगुडे, भाग्यतारा



# भेट झाली ती कशाला

भेट झाली ती कशाला
ओळखही वाढविली
मजशी लावूनि आशेला

प्रीति झुगारूनि दिली
होते जायचेच तुला
का मग ‘ ज्योत ’ पेटविली

माझ्या मन–कापराला
का तू आग लावियली
खेळ विस्तवाशी केला

माझ्या जीवनाची होळी
नको शिवूस राखेला
आता तीहि थंडावली.

— ना. द. उम्बरकर.

मराठी ग्रंथ संग्रहालय
2493
दा. क्र. 2-346
काव्य ९४१९०१५
ग्रंथ शाखा (स्थळ



# शब्द उमलू लागले

वृक्ष जेव्हा पर्ण गाळू लागले
अंतराला दुःख जाळू लागले....

एकदा जो बहरला त्या ताटव्याला
भ्रमर सारे आता टाळू लागले

काय झाले मी कुणाला सांगताना
लोचनांचे नीर वाळू लागले

येथल्या गर्दीत स्वप्ने शोधताना
वचनांचे फास आवळू लागले

एकट्याने चालता, विमनस्क वाटा
चांदणेही पाय पोळू लागले

हुंदक्यांनी वेढता आयुष्य सारे
गंध गहिरे शब्द उमलू लागले

– डॉ. शंतनु चिंधडे.



# बोलल्यावाचून सारे

बोलल्यावाचून सारे बोलूनि तो राहिला –
बोलक्या साऱ्या कृतींनी सांगुनि तो राहिला –
पाहतो सारे तरीहि, पाहतो काही न, तो –
राहुनी साऱ्यास साक्षी, दावुनि तो राहिला –

सर्वदूर सूर त्याचा, गात तो नाही तरीहि –
गीत शब्दातीत सारे गाउनि तो राहिला –
ऐकता सारे तरीहि ऐकतो काही न तो–
येथली येथे गाऱ्हाणी लावुनि तो राहिला –

राहुनी पाण्यातही तो कोरडा आहे सदा –
होउनी पाणी सदा भिजवुनि तो राहिला –
राहुनी अग्नीतही जळत नाही तो कधी –
होउनी ज्वालाग्रही द्राहुनी तो राहिला –

राहुनी दगडांतही झिजत नाही तो कधी –
होउनी दगडधोंडा झिजवुनि तो राहिला –
राहुनी वाऱ्यातहि उडत नाही तो कधी –
होउनी वारा परी उडवुनि तो राहिला –

असुनि साऱ्यातून तो दिसत नाही कधी कुणा–
संपलेले द्वैत ज्याचे देव होवुनि राहिला–

- दत्तात्रय जयवंत जोशी



# साहित्यिक

जळगावची आई बहिना
साहित्यातील एक दागिना
आठवू आपण आज तयांना
सोडून वडाळ इथे वासना

गेले आपणापासून जे दूर
एक त्यांतीलच कुरुंदकर
आठवणीचे वाहून शब्दहार
इथे आठवू आज । ज्ञानवंतांना

आता साहित्याचा विचार करू
राष्ट्र त्यातून आपले उभारू
सत्य जगी जे तेच उच्चारू
करू या जागृत ऐक्य भावना

ठेवून दूर सर्व अहंकार
बनो साहित्यिक राष्ट्राधार
विनवी ‘ कराड ’ जोडून कर
प्रेम द्यावे परत जाताना

—भा. मु. कराड

# मी ही एक माणूस

हे जग भासते
आग–
काडी पेटीसारखे
माणसे
आतल्या काड्यांसारखी
प्रत्येकाला एकेक गुल
घर्षणाचा अवकाश
पेटणारी, रूप पालटणारी
होय,
माणसे पेटतात
पेटवतात निखारा, शब्दांचा, वाणीचा
जाळून टाकतात कोंब
कोमल भावनांचा
का ?
न पेक्षा पेटूच नये
बंद आग–
काडीपेटीतच बंद रहावे
वाट पहावी पेटणाऱ्या क्षणांची
समईची ज्योत
पेटविण्यासाठी, घर्षणाची
मी ही एक माणूस
काडी पेटीतला
गुल असलेला
पेटण्याची वाट पहाणारा
एकदा तरी घर्षण व्हावे
ज्योत पेटवावी
शांत व्हावे त्याच अमृतक्षणी
कार्बोडाइज्ड काडीसारखे

– राम बेटावदकर.

# आरती

पाठमोरी छाया पाहू कुठवर
दूर दूर दूर गेला दिलेवर
देश रक्षणाची ठेवून जाणीव
गेला माझा मर्दाना मुलखावर

म्हणे मला राया, तू वीराची राणी
का पापण्यातुनी येतो महापूर
मला आहे ठाव त्यांचा पराक्रम
का माझ्या मनी उठे शंकेचं काहुर

का असं मन बाई दिलं देवानं
तेच करि प्रश्न तेच सांगे उत्तर
येऊ दे गाजवुन लढाई त्यांना
प्राणाच्या आरतीनं पूजीन ईश्वर

– तु. ल. रेवगे.



# गीता म्हणजे-

श्रीकृष्ण अर्जुन ही जोडी
असत्याचे डोंगर फोडी
सत्संगाची दाखवी गोडी
सद्भावाची उघडी कडी
सोडवी गीता जीवन कोडी
गायन गाऊन लावी गोडी
वाचत जाऊ घडी घडी
उलगडता अर्थाची कोण्डी
दिसेल आयुष्यातील गोडी
घेऊ कार्यासाठी उडी
असत्याची वळे बोबडी
सत्याची मान राही खडी
पहा काय गीतेची गोडी
शिकण्यासाठी करू तातडी
होऊ अर्जुन घेऊनी उडी
श्रीकृष्ण अमरत्वाची चढवी पगडी

—ज. कृ. देवधर, (गिझरवाले)

# कवि परिचय

१) **रामकृष्ण पंजाबराव चौधरी** B.A.

नागपूरकडील. सध्या ठाणे जिल्ह्यातील मांडा डाकघर (टिटवाळा) येथे सब–पोस्टमास्तर. कथा–कविता अनेक मासिकातून व वृत्तपत्रातून प्रसिद्ध.

२) **महादेव रामदास पाठक** B.A.D.Ed. (**गीतविहारी**)

प्राथमिक शिक्षक. पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील बोरी येथे. सत्तर कविता आजवर प्रसिद्ध.

३) **सुनील महादेव सावंत** B. Com. नंतर M. Com.



ला बसत आहेत. मूळचे सिंधूदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील भिरवंडे गावचे. सध्या मुंबईला नोकरी आणि शिक्षण. ज्वालामुखी नावाचा कविता संग्रह मित्राबरोबर प्रसिद्ध.

४) **अशोककुमार त्रिभुवन** B. A.

नोकरी. पुणे जिल्ह्यातील चिंचवड येथे. साहित्य चळवळीत सक्रीय सहभाग.

५) **अशोक गोविंदराव काळे** M. A.

पुण्यातील टेल्को कंपनीत नोकरी. आकाशवाणीवरून कविता वाचन. अनेक मान्यवर मासिक–साप्ताहिकांतून कविता प्रकाशित. काव्यविषयक अनेक पारितोषिके प्राप्त.

**६) नंदकिशोर बलवंत शुक्ल** M.A.B.J.

चाळीसगाव येथील. व्यवसायाने पत्रकार. अनेक नामवंत नियतकालिकांमधून सातत्याने साहित्य प्रसिद्ध. ' स्वप्निल कविता ' काव्यसंग्रह.

**७) प्रभाकर अनंत पुराणिक** M A.,B.Ed.

धुळे येथे अध्यापन कार्य. आकाशवाणी जळगाववरून काव्य वाचन. लघुकथा पुरस्कार आणि काव्य पुरस्कार प्राप्त. बालसाहित्याची पाच पुस्तके प्रकाशित.

**८) मारोतराव मुकुंदराव कराड** D.C.E.

बीड जिल्ह्यातील परळी वैद्यनाथ येथे क. अभियंता म्हणून, माजलगाव कालवा वि ४ वर, नोकरी. काव्यप्रेमी

**९) विलास विनायक फडके** B. A.

पनवेल येथे नोकरी. वडील पत्रकार. कथा–कविता लेखनाची आवड. मराठी साहित्य मंडळ, पेण–अध्यक्ष

**१०) अवधूत भीमराव म्हमाणे** B.A. (Hon.) B.Ed.



सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील. माध्यमिक शिक्षक. ' क्षेत्र टिटवाळा माहात्म्य ' व ' प्राकृत गणेश स्तोत्र ' ही पुस्तके प्रसिद्ध. समाज सेवेची आणि लेखनाची आवड.

११) सुनंदा किसन कुंभकर्ण B.Com. (Hons.)



नासिक रोड येथे संरक्षण लेखा विभागात हिशेब तपासनीस.

१२) भाग्यवंत लक्ष्मणराव (उर्फ भाग्यतारा) B. A.



शेतकरी. सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील नवचारी अकलूज या गावचे.

१३) सौ. वैशाली दिनकराव देशमुख, दहावी

गृहकाम. अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर येथील. कथा काव्य लेखनाची आवड.

१४) **नारायण उंबरकर** B.Com. LL.B., B.F., C. A.



मूळचे नांदेड येथील. आता पुण्यात. १२ वर्षे संघवी उद्योग समूहाचे जनरल मॅनेजर म्हणून काम. सध्या चार्टर्ड अकाउंटंट म्हणून स्वतंत्र व्यवसाय. कॉलेजात असल्यापासूनच साहित्याची आवड.

१५) **काशिनाथ नथू साळुंके** B.Sc. B.Ed.



माध्यमिक शिक्षक. मासिके, साप्ताहिके यातून काव्य लेखन.

१६) **मधुकर एकनाथ निलेगावकर** B. A.

लातूरला नगर-रचना कार्यालयात नोकरी. काव्य-लेखनाची आवड.

### १७) ज्ञानेश्वर विठ्ठल वाघमारे (उर्फ सूर्यकांत) D.Ed.D.M.



शिक्षक. लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील शिवणी कोत्तल या गावचे.

### १८) यशवंत श्रीपाद बर्वे D.M E.



मूळचे गोव्यातील सत्तरी तालुक्यातील बिंबल गावचे. लघुउद्योजक. 'टेक्नोलेक' ह्या उद्योगाच्या नावाने 'हॉट स्प्रिंग' गीझरचे उत्पादन. लहानपणापासून कविता करण्याचा छंद.

### १९) विनायक महादेव त्रिपत्तीवार

M. A. चे शिक्षण घेत आहेत. चंद्रपूर जिल्ह्यातील मूल तालुक्यातील बेलगाटा या आदिवासी खेड्यात वास्तव्य. चारशे ब्याऐंशी कविता आजवर लिहिल्या.

२०) **हरिश्चंद्र गणपत पागडे** F.Y. (आर्टस्)

मूळचे कोकणातील गुहागरचे. मुंबईला नोकरी.

२१) **रामकुमार पंडित रायवाडीकर**

मूळचे अहमदनगर तालुक्यातील रायवाडीचे. सध्या लातूरच्या शाहू महाविद्यालयात शिक्षण. दोन प्रातिनिधिक काव्यसंग्रह प्रकाशित. कथा–कविता लेखन.

२२) **दत्तात्रय जयवंत जोशी** S. S. C

पुणे येथे ड्राफ्टस्मन. 'शब्द शिल्प' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध

२३) **सावित्रीकुमार शिगटे** M.A.B.Ed.

गुळुंब हायस्कूलला शिक्षक. सातारा जिल्ह्यातील वीर-माडे गावी. आकाशवाणीवर कार्यक्रम. कविता लेखनाची आवड.

२४) **सावळाराम मेघश्याम जोशी (उर्फ रामानंद)** S.S.C.

सोलापूर जिल्ह्यातील 'भंडार कवठे' गावचे. काव्य लेखनाची त्यांच्या घराण्यातील ही तिसरी पिढी.

२५) **प्रकाश नवलसिंग बावीस्कर** D. Ed.

प्राथमिक शिक्षक ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५९१३
वा. क्र. २२३४८
काव्य ९५१/२०K
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

२६) **एम्. के. तथा– मधुकर काशिनाथ कुलकर्णी.**
B. Com. L. L. B



पुण्यात वीस वर्षांपासून प्राप्तीकर व विक्रीकर सल्लागार. १९७८ पासून श्री. शारदा बँक लि. पुणेचे अध्यक्ष. बँकेच्या स्थापनेमध्ये महत्त्वाचे योगदान कविता करण्याची प्रथमपासून आवड. कर व बँकिंग व सहकारी कायद्यावरील इंग्रजीमधून पुस्तके प्रसिद्ध. महाभारतावरील चक्रव्युहयुद्ध, अभिमन्यू पराक्रमादिवर १०० कडव्यांचे काव्य.

२७) **दिनेश शिवाजी पाटील १० वी**

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील सोयगाव या गावचे.

२८) **डॉ. शंतनु चिंधडे.**

घराण्यात कविता करणारी तिसरी पिढी. वैद्यकीय महाविद्यालयात– फारसे वातावरण नसता कविता लेखन. स्वराज्य, मनोहर, वाङमयशोभा आदितून थोडी प्रसिद्धी. पुण्यात नेत्रतज्ज्ञ म्हणून व्यवसाय.

२९) **श्री. तुकाराम लहानु रेवगे,** बी. ए. बी. एड,

शिक्षक. नगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील लिंपणगावचे.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५९३
दा. क्र. २०३५८
९८।१०।९

REFBK-0024358

REFBK-0024358

# उद्गार कविता व्यासपीठ

नलिनी प्रकाशनाच्या तर्फे १९७५ पासून उद्गार हे दिवाळी वार्षिक प्रसिद्ध होते. १९८३ पासून उद्गार कविता व्यासपीठ सुरू करण्याची घोषणा आम्ही केली. केवळ पधरा दिवसात आम्हाला महाराष्ट्रातील नवोदित कवींचा चांगला प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्रातील बावीस जिल्ह्यातील आणि महाराष्ट्राबाहेरील १४० कवींनी उद्गार कविता व्यासपीठाला समजावून घेतले.

कविता माणसाला आवडते. जगातील वाङ्मयाची सुरुवात काव्यानेच झालेली आहे. पण आजकाल गावोगाव कवि निर्माण होऊनही त्यांच्या कवितेला रसिकांपर्यंत जाता येत नाही. रसिकांपर्यंत पोहचण्याचे माध्यम म्हणजे प्रसिद्धी, गायन, वाचन. कवितेला ही प्रसिद्धी देणारी मासिके कवितेवर प्रेम करतात. खऱ्या अर्थाने कवितेला प्रसिद्धी देणारी मासिके फारच थोडी आहेत; बाकीच्या सर्वांची अवस्था पान भरण्यासाठी कविता छापणे ही होय. त्यामुळे एक तर अर्धीकच्ची, अपक्व आणि अजाण कविता छापली जाते, कारण निवड आणि निकष याची फारकत या ठिकाणी झालेली आढळते. त्यामुळे असंख्य कवींवर अन्याय होतो. यासाठी आम्ही हा उपक्रम सुरू केला आहे.

ह्या उपक्रमाला विरार, कल्याण, बोरी (इंदापूर), मुंबई, चिंचवड, पुणे, चाळीसगाव, धुळे, परळी वैजनाथ, पेण, सोलापूर, दर्यापूर, लातूर, सातारा, विरमाडे, भंडारकवठे (सोलापूर) सोयगाव (नासिक), नासिक रोड, नवचारी अकलूज (सोलापूर) शिवणी कोत्तल (लातूर), बेलगाटा (चंद्रपूर) निमगूळ (धुळे) इत्यादि ठिकाणाहून आलेल्या कवींच्या निवडफॉर्ममधील अटीप्रमाणे आलेल्या सर्व कविता डॉ. वि. म. कुलकर्णी व दत्ता जी कुलकर्णी यांनी निवडल्या. त्यांनी निवडलेल्या कवितांचे संकलन 'उद्गार' नावाने श्री. बाळासाहेब कारले यांनी प्रकाशित करण्याचे मान्य केले. त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. कवितेला न्याय देण्याचा उद्गार यापुढे आपल्या सामर्थ्याप्रमाणे प्रयत्न करील.

---

*सौ. संजीवनी मराठे यांच्या अध्यक्षतेखाली २६ मे ८४, आपटे प्रशाला, पुणे येथे झालेल्या कवि संमेलनात या संग्रहाचे प्रकाशन झाले.